**शिक्षणामुळेच होईल अल्पसंख्यांकांचा विकास- एकनाथराव खडसेरविवार, ०७ फेब्रुवारी, २०१६**
**अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृहाचे भुमिपूजन**

जळगाव : अल्पसंख्याक समाजातील विविध घटकांना समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षित करणे आवश्यक आहे. शिक्षणातून या समाज घटकांचा विकास करण्यासाठी राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागाने पुढाकार घेतला आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री एकनाथराव खडसे यांनी येथे केले.

येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारात अल्पसंख्याक समाजाच्या मुलींसाठी वसतीगृह बांधकामाचे भुमिपूजन श्री.खडसे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते उपस्थितांशी संवाद साधतांना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन हे होते. तर राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष मोहम्मद हुसेन खान, जळगाव लोकसभा मतदार संघाचे खासदार ए. टी. नाना पाटील, अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रधान सचिव जयश्री मुखर्जी, सहसचिव अैनुल अत्तार, प्राचार्य डॉ.आर.पी. बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत वसतीगृहाच्या जागेचे भुमिपूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शनकरतांना श्री.खडसे म्हणाले, अल्पसंख्यांक समाज घटकांमध्ये शिक्षणामुळे जागृती निर्माण करुन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे शासनाचे धोरण असून त्यासाठी अल्पसंख्याक विकास विभाग विविध योजना राबवित आहे. अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह उभारणे हा या योजनेचाच भाग आहे. राज्यात असे 50 वसतीगृह बांधण्याचा शासनाचा मानस आहे. शिवाय सामाजिक न्याय विभागाप्रमाणे अल्पसंख्याक समाजाच्या मुलींना अनुदान देऊन शिक्षण सुविधा देण्याबाबतही शासन सकारात्मक पद्धतीने पावले टाकत आहे. अल्पसंख्याक समाजात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्याने मुलींच्या शिक्षणाला शासनाचे प्राधान्य आहे. त्यांच्या निवासाची सोय शहरांमध्ये व्हावी यासाठी अशाप्रकारे वसतीगृह उभारण्यात येत आहेत. यासोबतच आपल्या जिल्ह्यात मुक्ताईनगरला पहिले पॉलीटेक्निक कॉलेज, चोपड्याला अल्पसंख्याकांच्या व्यवसाय शिक्षणासाठी आयटीआय, तसेच जळगाव लोकसभा मतदारसंघ क्षेत्रात आणखीन एक आयटीआय सुरु करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, शासकीय सेवेत अल्पसंख्यांकांचे प्रमाण वाढले पाहिजे त्यासाठी स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांना अर्थसहाय्याची योजना आहे. अल्पसंख्याक समाजाच्या वस्त्यांच्या विकासासाठी शासनाने विकास निधी दिला आहे. त्यातून जिल्ह्यात अनेक ठिकाणी विकासकामे होत आहेत. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात 1 कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल.

विद्यार्थ्यांना आवाहन करतांना ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसायाभिमुख व्हावे. त्यासाठी मुद्रा बँकेसारख्या विनातारण 10 लाख रुपयांपर्यंत कर्ज देणाऱ्या योजनेची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. अल्पसंख्याक समाजातील दुर्बल घटकांना शिक्षणाची दारे उघडून आणि मदतीचा हात देऊन त्यांचा विकास करण्याची शासनाची भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.